# Self-help and Self-Governance Movement

Known As

# Amhi Amachya Arogyasathi

**Reg.No. F134 /Gad.**

Registered Non-Governmental Oragnisation
Under Relevant Acts in India

# ‘पोषण हक्क’ प्रकल्प

मराठी नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!

वार्षिक अहवाल- एप्रिल 2014 ते मार्च 2015

वित्तीय सहकारी संस्था -- एन.एस.एफ-(नरोत्तम सेख्सोरिया फाउंडेशन )

मार्गदर्शक संस्था - साथी संस्था

प्रकल्प कालावधी - 3 वर्षे

# संस्थेची संरचना

प्रकल्प संचालक
श्रीमती शुभदा देशमुख

↓

प्रकल्प समन्वयक
श्रीमती अर्चना उरकुडे
नागपूर प्रकल्प

↓

हिशोबनीस
श्रीमती रजनी डोंगरवार

↓

फँसिलीटेटर
शहरी
७ महिला

# संस्थेचे कार्यक्षेत्र



## नागपूर

**नागपूर शहरातील 7 वस्त्यामधील 22 अंगणवाड्या**

**भांडेवाडी, चांदमारी, पडोळे नगर, हिवरी नगर, कुंभारटोली , ताजबाग , भांडेप्लॉट**

# प्रकल्पाचे उद्दिष्ट

- अंगणवाडी पातळीवर मिळणाऱ्या सेवांना लोकाधारित देखरेख प्रक्रियेद्वार उत्तरदायी करणे.

- अंगणवाडी कार्यक्रमांना लोकाधारित देखरेख प्रक्रियेअंतर्गत सक्षम करून लोकाभिमुख व परिणामकारक करणे.

- संशोधन, अभ्यास व नाविन्यपूर्ण उपक्रम व जुन्या उपलब्ध असलेल्या पद्धती यांचे दस्तऐवजीकरण करून पोशण हक्क व अन्नसुरक्षेसाठी जागृती करणे.

- लोकाधारित देखरेख प्रक्रियेची एक अत्यंत उपयोगी व आवश्यक प्रक्रिया म्हणून एकात्मिक बाल विकास सेवांमधील स्थान बळकट करणे.

# आतापर्यंत घेण्यात आलेले कार्यक्रम

| अ. क्र. | कार्यक्रम | वस्ती | प्रक्रिया |
|---|---|---|---|
| 1 | माता गट बैठक | 7 वस्तीतील 22अंगणवाड्या | मासिक बैठक |
| 2 | बालहक्क गट बैठक | 7 वस्तीतील 22अंगणवाड्या | दैनिक देखरेख प्रक्रिया. |
| 3 | वस्ती पातळीवरील देखरेख समिती बैठक | 7 वस्ती – 7 समित्या | द्विमासिक बैठक (एकूण 28 बैठका) |
| 4 | प्रकल्प पातळीवरील देखरेख समिती बैठक | 2 प्रकल्प – 2 समित्या | वर्षातून 8 बैठक (आतापर्यंत 7 बैठक झाल्या.) |
| 5 | शहर सुकाणू समिती | जिल्हा स्तरावरील 1 समिती | वर्षातून 3 बैठका (आतापर्यंत 2 बैठक झाल्या.) |
| 6 | अंगणवाडी टूल भरणे | 7 वस्तीतील 22 अंगणवाड्या | आतापर्यंत 4 फे-या भरून झालेत. |
| 7 | प्रात्यक्षित कृती कार्यक्रम | 7 वस्तीतील 22 अंगणवाड्या | प्रत्येक अंगणवाडीत एकदा (एकूण 22 कृती कार्यक्रम.) |

# आतापर्यंत घेण्यात आलेले कार्यक्रम

| अ. क्र. | कार्यक्रम | वस्ती | प्रक्रिया |
|---|---|---|---|
| 8 | स्तनपान व पोषण आहार कार्यक्रम | 2 वस्ती (ताजबाग, कुम्भारटोली) | चित्रकथा व साधन व्यक्ती (डॉ. मिना शेलगावकर) द्वारे मार्गदर्शन |
| 9 | महिला सक्षमीकरण कार्यक्रम | 3 वस्ती (चांदमारी व कुंभारटोली, भांडेप्लॉट) | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती दिन निमित्ताने वस्त्यांमध्ये किशोरी व महिला सक्षमीकरण कार्यक्रम साजरे करण्यात आले. पांढरीपांडे समाजकार्य कॉलेज मधील प्राध्यापक |
| 10 | किशोरी सक्षमीकरण जनजागृती कार्यक्रम व प्रशिक्षण | 5 वस्ती (ताजबाग, भांडेप्लॉट, कुंभारटोळी, पडोळे नगर, हिवरी नगर ) | गाणी, गटचर्चा, नाटक व साधन व्यक्ती द्वारे मार्गदर्शन व आरोग्य तपासणी |
| 11 | अतिसार सप्ताह जनजागृती कार्यक्रम | सर्व 7 वस्ती | साधनव्यक्तीद्वारा मार्गदर्शन (राष्ट्रीय बाल आरोग्य सेवा केंद्रातील कर्मचारी) |
| 12 | जनसंवाद कार्यक्रम | ताजबाग व कुंभारटोळी वस्तीमध्ये | प्रश्न उत्तरे व चर्चा, निर्णय, ठराव |
| 13. | अभ्यास सहल<br>17-12-14 ते 19-12-14 | एकजूट संस्था, चक्रधरपूर, झारखंड | कार्यक्षेत्र भेट, चित्रकथा व बैठकीतील विषयांचे निरीक्षण, चलचित्रफीत, संवाद कौशल्य व चर्चा. |

# नाविन्यपूर्ण कार्यक्रम

| अ. क्र | कार्यक्रम | वस्ती | प्रक्रिया |
|---|---|---|---|
| 1. | गरोदर मातांकरिता पूरक पोषण आहार व आरोग्यशिक्षण कार्यक्रम | 7 ही वस्त्या मधील गरोदर व स्तनदा मातांकारिता. | या कार्यक्रमाकरिता शासकीय मेडिकल रुग्णालयातील डॉ. स्मृती गेडाम व डॉ. कांचन जयस्वाल, केंद्रीय पोषाहार विभाग – भारत सरकार तर्फे पोषाहार तज्ञ श्री. मुकुंद माहोरे, नगरसेवक श्री. सागर लोखंडे, अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती. उषा वानखेडे व कविता पडोळे व संस्थागत प्रतिनिधी उपस्थित होते. |
| 2. | पूरक पोषण आहार चाटवणी कार्यक्रम | 7 ही वस्त्या मधील 0 ते 2 वर्ष वयोगटातील मुलांकरिता. | प्रसिद्ध आहारतज्ञ डॉ. जयश्री पेंढारकर द्वारा घरी उपलब्ध असलेल्या साहित्याचा उपयोग करून विविध पोष्टिक पदार्थ बनविण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. |
| 3. | बाल पोषण व स्वच्छता अभियान जनजागृती कार्यक्रम | 7 ही वस्त्यांमध्ये बाल पोषण व स्वच्छता अभियान राबविण्यात आले. | अंगणवाडीतील मुले, माता समिता सदस्य, वस्ती पातळीवरील समिती सदस्य, अंगणवाडी कार्यकर्ते व संस्था कार्यकर्ते मिळून रॅली काढण्यात आली. स्वच्छतेचे संदेश लिहिलेले फलक व पाट्या तयार करण्यात आल्या. वस्तीतील परिसर साफ करण्यात आला व घरा-घरा मध्ये बाल पोषणाचा संदेश पोहचविण्यात आला. |
| 4. | अर्ध वार्षिक वाढदिवस कार्यक्रम | 22 अंगणवाड्यांमध्ये अर्ध वार्षिक वाढदिवस झालेत. | मुलांच्या सुधृढ वाढी करिता पूरक पोषण आहार मिळावा म्हणून अंगणवाडीमध्ये व घरा-घरांत बाळ कोपरा तयार करण्यात यावा याकरिता हे कार्यक्रम घेण्यात आले. |

# आढावा व नियोजन बैठक आणि ADVOCACY ACTION

| अ. क्र. | बैठक | मुद्दे | प्रक्रिया |
|---|---|---|---|
| 1. | दि. 27-6-2014 ला साधन व्यक्ती- हेमराज पाटील, साथी, पुणे | केस स्टडी लिहिण्याचे प्रशिक्षण, जनजागृती का करायची, जन जागृती माध्यम, जनजागृतीची साधने | सकारात्मक व नकारात्मक केस स्टडी लिहिण्याचा आशय, लेखी तक्रार, समक्ष पंचनामा कसा करायचा याबाबत समजावून सांगण्यात आले. जनजागृतीची माध्यम व साधने यातील फरक समजावून सांगण्यात आला. |
| 2. | 17-9-2014 | अंगणवाडी टूल व वार्षिक टूल बद्दल चर्चा, COPASAH टीम करिता कार्यक्षेत्र भेटीचे नियोजन | कार्यक्षेत्र भेटीकरिता ताजबाग व भांडेवाडी वस्तीतील अंगणवाड्याची निवड करण्यात आली. तारीख व वेळ ठरविण्यात आली. |
| 3. | 10-9-2014 ला सुकाणू समिती बैठकीतील ठरावाप्रमाणे | • अंगणवाड्यातून बाद झालेले लसीकरण सुरु करणेबाबत.<br>• नवीन वजनकाटे पुरवठा.<br>• अंगणवाडीकरिता स्वतंत्र जागा व वाढीव भाडेदर.<br>• ICDS प्रकल्प पातळीवर VCDC किंवा CTC चे आयोजनाबाबत.<br>• NRC च्या विस्ताराबाबत. | श्रीमती. शुभदा देशमुख, लीलाताई चितळे, अँड. रेखा बारहाते, सी.डी.पी.ओ. ज्योती कडू व अर्चना उरकुडे यांच्या तर्फे महानगरपालिकेचे आयुक्त व उपायुक्त तसेच महिला व बाल कल्याण विभागाच्या सभापती व महापौर यांना निवेदन पत्र सादर करण्यात आले. |

# जनसंवाद कार्यक्रम

| अ. क्र. | सुटलेले मुद्दे | न सुटलेले मुद्दे | अधिकारी / पदाधिकारी वर्गांचे निर्णय |
|---|---|---|---|
| 1. | पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. | पाण्यात मेडीक्लोर घातले जात नाही. पाण्याचे फिल्टर नादुरुस्त आहेत. | स्थानिक नगरसेवकांनी अंगणवाडी सेविकेला महानगरपालिकेच्या झोन कार्यालयातून पाणी शुद्धीकरणाचे औषध मिळवून देण्यास मदत करतील. |
| 2. | 22 पैकी 10 अंगणवाड्यांमध्ये लसीकरण सुरु आहे. | 12 अंगणवाडीतील लसीकरण एप्रिल 2014 पासून पूर्णपणे बंद होते. | महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग, स्थानिक नगरसेवक, बाल विकास अधिकारी व माता समिती सदस्य यांनी आयुक्त, आरोग्य सभापती, महिला व बाल विकास सभापती व महापौर यांच्याकडे पाठपुरावा करावा. |
| 3. | 11 अंगणवाड्यामध्ये बाल कोपरा तयार झालेला आहे. | 11 अंगणवाड्यामध्ये बाल कोपरा तयार झालेला नाही . | अंगणवाडीतील बाळकोप-याकरिता लागणारा निधी लोकसहभागातून मिळविण्याचा प्रयत्न करावा व महिला व बाल विकास विभागाच्या बजेटमध्ये निधीची तरतूद करण्यात यावी याकरिता तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा. |
| 4. | 9 अंगणवाड्यामध्ये वजनकाटे सुरु आहेत. या अंगणवाड्यामधील वजन, उंची व वृद्धी चार्ट अद्यावत आहे. | 13 अंगणवाड्यामध्ये वजनकाटे नादुरुस्त आहेत. | महिला व बाल कल्याण विभागाने नवीन वजनकाट्या करिता त्यांच्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करावी. राज्यस्तरीय देखरेख समितीद्वारा पाठपुरावा घेण्यात यावा. लोकसहभाग मिळविण्याकरिता आव्हाहन करावे. |

# जनसंवाद कार्यक्रम

| अ. क्र. | सुटलेले मुद्दे | न सुटलेले मुद्दे | अधिकारी / पदाधिकारी वर्गांचे निर्णय |
|---|---|---|---|
| 5. | एन.आर.सी. मध्ये मध्यम व तीव्र कुपोषित मुलांना वैद्यकीय तपासणी व उपचारव्यवस्था उपलब्ध. | पोषण पुनर्वसन केंद्र व अंगणवाडीतील वाढवृद्धीचे मापदंडा तील असमानता. | पोषण पुनर्वसन केंद्र व अंगणवाडीतील वाढवृद्धीचे मापदंड समान असावेत याकरिता राज्य शासनाने केंद्रीय महिला व बाल कल्याण विभागाकडे प्रस्ताव पाठवावा आणि राज्य स्तरीय देखरेख समितीतर्फे पाठपुरावा घेतला जावा. |
| 6. | कार्यक्षेत्रातील 12 अंगणवाडीना स्वतंत्र इमारत नाही. | अंगणवाडी करिता मिळणारे 750 रु. मासिक भाडे वाढीव दराप्रमाणे मिळालेले नाही. | अंगणवाडीकरिता जागा मिळवून देण्याकरिता सी.डी.पी.ओ., नगरसेवक, संस्था प्रतिनिधी व वस्ती पातळीवरील समिती सदस्य यांनी संयुक्त प्रयत्न करावे. राज्य स्तरीय देखरेख समितीद्वारे पाठ पुरावा घेतला जाईल असे ठरविण्यात आले. |
| 7. | 22 अंगणवाड्यापैकी 14अंगणवाड्यामध्ये आहार पोष्टिक दर्ज्याचा येतो. | ताजबाग मधील अंगणवाड्यामध्ये श्री. अशोक वानखेडे संचलित असलेल्या बचत गटांमार्फत निकृष्ट दर्ज्याचा आहार मिळतो. | महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी, आयुक्त व समाज कल्याण अधिकारी आणि सभापती यांना सदर आहाराचे नमुने सादर करण्यात यावे व माता समिती सदस्याद्वारा लेखी तक्रार नोंदविली जावी. |
| 8. | सी.डी.पी.ओ. व इतर कर्मचारी यांना सदर कार्यक्षेत्राचा कामाचा अतिरिक्त भार दिलेला आहे. | एकात्मिक बाल विकास विभागामधील आर्थिक तुटवडा. | सी.डी.पी.ओ., सुपरवायझर ची रिक्त पदे शासनाने तातडीने भरावी. वाढीव मानधनाकरिता लागणारा निधी केंद्रीय वित्त विभागाने मंजूर केलेला नाही. हा मुद्दा राज्य स्तरीय देखरेख समितीमध्ये रेटून धरला जाईल असे ठरविण्यात आले. |

# जनसंवाद कार्यक्रम









नागपूर, बुधवार, ४ मार्च २०१५

सकाळ नागपूर TODAY

## शहरातील अंगणवाड्यांतील वजनकाटे बिघडले

अंगणवाडी सुरू झाल्यानंतर एकदा वजनकाटे पुरविले होते. यानंतर नवीन वजनकाटे पुरविले किंवा नाहीत, याबाबत शंका आहे. निवडक अंगणवाड्यांमध्ये वजनकाटे आहेत. मोठ्या प्रमाणात अंगणवाड्यांमध्ये वजनकाटे नाहीत, हे मात्र सत्य आहे.

अधिकारी अनभिज्ञ


नागपूर, शनिवार, २८ फेब्रुवारी २०१५

सकाळ नागपूर TODAY

## झोपडपट्टीतील मुले लसीकरणापासून वंचित

जनसंवाद कार्यक्रम : अंगणवाडीसेविकांनी व्यक्त केलेल्या भावना

महापालिकेच्या अधिकाऱ्यांची पाठ


सकाळ नागपूर TODAY

## अडीच लाख अंगणवाडी कर्मचारी वाढीव मानधनापासून वंचित

वाढीची केवळ घोषणाच : तीन महिन्यांपासून वेतन नाही

# वर्षभरतील वर्तमानपत्र कात्रण



# IEC Material तयार व प्रशिक्षण








# IEC Material तयार व प्रशिक्षण
























# भेटी देणाऱ्यांचे तपशील

- दि. 12-9-2014 ला कुंभार टोली वस्तीतील अंगणवाडी क्रमांक 103 व ताजबाग मधील अंगणवाडी क्रं. 150 या दोन अंगणवाड्यांना Avantha foundation, पुणे येथील डॉ. जितेंद्र सावकार व त्यांची टीम भेट दिली. ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य संबंधित परिस्थिती व अंगणवाडीतील सेवा सुविधांचा अभ्यास करण्याकरिता भेट देण्यात आली.



- दि. 18-9-2014 ला COPASAH प्रतिनिधींनी ताजबाग व भांडे वाडी वस्तीतील अंगणवाड्यांना भेट दिली. एकात्मिक बाल विकास सेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रीये अंतर्गत होणारे बदल व परिणाम समजून घेण्याकरिता ही भेट देण्यात आली. कार्यक्षेत्र भेटीनंतर बाल विकास अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली व आलेल्या अनुभवाचे आदान प्रदान करण्यात आले.



- दि. 16-3-2014 ला ऑस्ट्रेलियातील ब्रिस्बेन येथील 74 वर्षीय मिस. मागेट यांनी ताजबाग वस्तीला भेट दिली व तेथील किशोरी मुलींसोबत शिक्षण व एकंदरीत जीवनातील अनुभांचे आदानप्रदान केले. त्यांच्यासोबत डॉ. मीना शेलगावकर, श्रीमती सुषमा पनकुले व श्री. चंद्रकांत शेटकर उपस्थित होते.



# गुणात्मक बदल

➢ सर्वच अंगणवाडीमधील पिण्याच्या व वापरावयाच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला आहे.

➢ 50 % अंगणवाड्यामध्ये पिण्याच्या पाण्यात मेडीक्लोर घातले जाते.

➢ 40 % अंगणवाड्यामधील वाटर फिल्टर दुरुस्त करण्यात आलेले आहे.

➢ 60 % अंगणवाड्यामधील अंगणवाडीतील लसीकरण सुरु झालेले आहे.

➢ राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रमा अंतर्गत 30 % अंगणवाड्यामध्ये बाल आरोग्य तपासणी झालेली आहे.

➢ 40 % अंगणवाड्यामध्ये बाळ कोपरा तयार झालेले आहेत.

➢ 60 % अंगणवाड्यामध्ये आहार तक्त्याप्रमाणे पुरेसा पौष्टिक दर्ज्याचा आहार पुरवठा होत आहे.

➢ कुपोषित मुलांच्या घरी गृह भेटी सुरु झालेल्या आहेत.

➢किशोर वयीन मुलींकरिता गट तयार करून आरोग्यशिक्षण कार्यक्रम घेतले जात आहे.

➢ पोषण हक्क प्रकल्पातील राजपत्रातील समित्याप्रमाणेच महिला व बाल विकास विभागामार्फत अंगणवाड्यामध्ये समित्या तयार करण्यात आलेल्या आहेत. उदा. वस्ती पातळीवरील देखरेख समिती, बाल अधिकार समिती, प्रकल्प पातळीवरील देखरेख समिती.)

# शिकवण ( Learning's)

- महिला व बाल विकास विभागातील अधिकारी वर्ग व कर्मचा-यांची लोक सहभाग व जनजागृती अभियानाबाबत अनास्था.
- महिला व बाल विकास विभागातील अधिकाऱ्यांना स्थानिक पातळीवर खरेदीचे अधिकार नाहीत.
- महिला व बाल विकास अधिकारी व महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी यांच्यामध्ये काहीही समन्वय नाही.
- स्थानिक नगरसेवकांचे वस्तीतील अंगणवाडीशी काहीही उत्तरदायीत्व नाही.
- आहार पुरवठा करणाऱ्या बचत गट धारकासोबत महिला व बाल विकास विभागातील कर्मचा-यांची सांगड आहे.
- साहित्य उपलब्ध नाही म्हणून हात झटकण्याची वृत्ती. मात्र त्याकरिता पर्यायी व्यवस्था शोधली जात नाही.
- अंदाजे आकडेवारी भरून मासिक अहवाल सादर करणे व त्याकरिता सी.डी.पी.ओ. ची संमती असणे.

# प्रकल्पामध्ये काम करताना आलेल्या अडचणी

- उप-आयुक्त, बाल विकास अधिकारी पासून अंगणवाडी सेविकांपर्यंत सर्व स्तरावर कामाचा अतिरिक्त भार आहे. त्यामुळे देखरेख प्रक्रिया अडचणीत आहे.

- राज्य शासनाकडे महिला व बाल विकास विभागाकरिता आर्थिक तुटवडा आहे.

- राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या नावाखाली अंगणवाडीतील आरोग्य तपासणी, लसीकरण यासारख्या महत्वपूर्ण सेवा अडचणीत आलेल्या आहेत.

- प्रकल्प पातळीवरील समितीच्या बैठकीकरिता स्थानिक प्रतिनिधीच्या उपस्थितीमध्ये सातत्य राखणे फार अवघड जाते.

- स्थानिक प्रतिनिधी (नगरसेवक) यांना आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग या संदर्भात असलेल्या त्यांच्या जबाबदा-याविषयी कोणत्याही प्रकारचे दिशा निर्देश दिलेले नाहीत.

# आव्हाने ( Challenges)

- अंगणवाडी सेवांसंदर्भात न सूटलेले मुद्दे सोडविण्यासाठी महिला व बालविकास विभाग व महानगरपालिका यांच्यात समन्वय साधणे.

- अंगणवाडी सेवांमध्ये पिता  पालकांचा  सहभाग वाढविणे व एकात्मिक बाल विकास कर्मचाऱ्यामध्ये  ही  मानसिकता रुजविणे.

- उन्हाळी अधिवेशन व आर्थिक वर्षाचा शेवट या कालावधीमध्ये शहर सुकाणू समितीच्या बैठकीचे आयोजन करणे हे एक आव्हान आहे.

- आगामी जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन वस्ती पातळीवरील समिती सदस्य, माता समिती व बाल हक्क पोषण गट यांच्या हस्ते व्हावे याकरिता त्यांना अधिकाधिक सक्षम करणे.

- स्थानिक लोक प्रतिनिधिंना (नगरसेवक, आमदार) अंगणवाडी सेवांसंदर्भात उत्तरदायी करणे हे एक आव्हान आहे.

# पुढील वर्षातील कार्यक्रम व नियोजन

- लोकाधारित सहभाग वाढविण्याकरिता विविध जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे.
- जनसंवाद कार्यक्रमामधून न सुटलेल्या मुद्द्यांचा आढावा घेण्याकरिता जिल्हा शहर सुकाणु समितीच्या बैठकीचे आयोजन करणे.
- बालहक्क गटांच्या देखरेखी संबंधित क्षमता वृद्धी प्रशिक्षण घेणे.
- माता पिता पालक समित्यांची अंगणवाडी सेवांबाबत सहकार्याची भावना वाढविणे. माता पिता पालक समितींसाठी घरगुती पोषक आहार, पाककृती प्रशिक्षण आयोजित करणे.
- आहार पुरवठा करण्याकरिता स्थानिक बचत गटांना संधी मिळवून देण्याकरिता प्रयत्न करणे.
- विविध नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- सहामाही व वार्षिक अंगणवाडी टूल भरणे व माहितीचे विश्लेषण करणे.
- वार्षिक अहवाल तयार करणे.

# सोबत जोडलेले परिशिष्ट (ANNEX)

1. सविस्तर वार्षिक अहवाल – एप्रिल 2014 ते मार्च 2015
2. दोन्ही जनसंवाद अहवाल
3. शहर सुकाणू समिती अहवाल
4. प्रकल्प पातळीवरील देखरेख समिती बैठक अहवाल
5. अंगणवाडी तुलनात्मक रिपोर्ट कार्ड
6. दोन केस स्टडी

# धन्यवाद !